# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४
Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.
**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176
**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्र. मआविवि/पीआर/७१४/२०११ दि.१९ जुलै २०११

**वृत्त प्रसिध्दीसाठी**

**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक महानगरपालिका वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रम.**

## "आरोग्य विद्यापीठातर्फे एम.सी.आय.कडे प्रस्ताव सादर"

**नाशिक (दि.१९)** - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि नाशिक महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु करण्यात येणाऱ्या वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहे. याबाबत राज्य शासनाने आवश्यकता प्रमाणपत्र (Essentiality Certificate) दिलेले असून याबाबत भारतीय आयुर्विज्ञान परिषदेकडे (Medical Council of India) विद्यापीठातर्फे प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याची माहिती विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.डॉ.अरुण जामकर यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देतांना मा.कुलगुरुंनी सांगितले की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि नाशिक महापालिकेच्या सहकार्याने पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणार आहे. यासाठी नाशिक महानगरपालिका व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्यात परस्पर सामंजस्याचा करार करण्यात येणार असून त्यावर कार्यवाही सुरु आहे. या अभ्यासक्रमासाठी भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची परवानगी घेणे बंधनकारक असल्याने तसा प्रस्ताव विद्यापीठाने सादर केला आहे. या प्रस्तावामध्ये सुरुवातीला पहिल्या टप्प्यामध्ये आठ वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहे. यात मेडिसिन, सर्जरी, ऑबस्टेट्रिक्स ॲण्ड गायनाकॉलॉजी, पेडियाट्रिक्स, इ.एन.टी., ऑप्थाल्मोलॉजी, ॲनेस्थेशिया आणि आर्थोपेडिक्स् विषयांसाठी प्रस्ताव सादर केला आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये रेडियो डायग्नोसिस, बायोकेमिस्ट्री आणि पॅथोलॉजी विषयांचा प्रस्ताव सादर केला जाणार आहे. ते पुढे म्हणाले की, असा वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणारे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ पहिलेच विद्यापीठ आहे. यामुळे पदव्युत्तर डॉक्टरांची उपलब्धता होऊन त्यांच्या संख्येमध्येही वाढ होणार आहे. यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे ११ वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणेसाठी

आवश्यकता प्रमाणपत्र (Essentiality Certificate) मिळाले आहे. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेला पहिल्या टप्प्यामध्ये आठ अभ्यासक्रमाचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून दुसऱ्या टप्प्यामध्येतीन अभ्यासक्रमांचा प्रस्ताव सादर केला जाणार आहे. यामुळे राज्यामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा वाढणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आ.ना. सूर्यकर यांनी सांगितले की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि नाशिक महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु करण्यात येणाऱ्या वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमामुळे सामान्य जनतेला अधिक चांगल्या प्रकारची वैद्यकीय सेवा मिळणार आहे. या रुग्णालयांमध्ये सुरु करण्यात येणाऱ्या वैद्यकीय अभ्यासक्रमांमध्ये प्रत्येक विषयासाठी तीन याप्रमाणे आठ विषयांसाठी चोवीस डॉक्टर अध्ययन करणार आहे. रुग्णालयातील वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि व्याख्याता अशा स्वरुपात अध्ययनाचे काम करतील आणि उर्वरित आवश्यक शिक्षकांची नियुक्ती विद्यापीठामार्फत करण्यात येईल. यामुळे महापालिकेचे रुग्णालयातील सेवा अद्ययावत होतील असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणेबाबत नाशिक महापालिकेशी सातत्याने पाठपुरावा करण्यात येऊन विद्यापीठामध्ये नाशिक महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा प्रस्ताव विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये पारित करण्यात येऊन तो महापालिकेला सादर करण्यात आला होता. याबाबत महापालिकेच्या सभेमध्येही सदर ठरावाला मान्यता मिळाली असल्याचे पत्राद्वारे महापालिकेतर्फे कळविण्यात आले आहे.

Suryakar

**कुलसचिव**